**संक्षिप्त फौजदारी केस नं. ५०/२०२३**
**नि. क्र. ३७**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – प्रशांत विश्वनाथ केतकर,

**वय**– ३५ वर्षे , **व्यवसाय** – नोकरी,

**राहणार**– कोंडगाव, कातळवाडी, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. कोंडगाव तिठा पासुन ०२ ते ०३ मिनीटांच्या अंतरावर माझ्या भावाचे हॉटेल 'विमल नारायण' आहे. दिनांक २९/१०/२०२२ रोजी मी सदर हॉटेलमध्ये बसलेलो होतो. त्यावेळी माझा भाऊ – कौस्तुभ व वडील – विश्वनाथ हे दोघे देखील हॉटेलमध्ये बसले होते. त्यावेळी रात्री ०८:४५ ते ०९:०० वाजताच्या सुमारास हॉटेलच्या जवळ कोल्हापुर–रत्नागिरी रस्त्यावर लोकांची गर्दी झाली होती. त्यामुळे मी व कौस्तुभ त्या ठिकाणी काय झाले होते, हे पाहण्यासाठी तेथे गेलो होतो.

**०२**. तेथे चारचाकी गाडीचा अपघात झाला होता. सदर वाहनामध्ये मनोज मंगेश जागुष्टे अडकला होता. त्याला बाहेर काढण्यासाठी मी पोलीसांना मदत केली. सदरची गाडी कोल्हापुरकडुन रत्नागिरीकडे जाताना उजव्या बाजुला खड्डयामध्ये होती. सदरची गाडी खोलगट भागात खड्डयामध्ये पडली होती. मी तेथे कोणतीही चौकशी केली नाही. अपघात कसा झाला, याबाबत मला तेथे काही समजले नाही. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत कोणतीही चौकशी केली

नाही.

**(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)**

**०३**. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी रस्त्याच्या चुकीच्या बाजुला तेथे सदरची चारचाकी गाडी होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर इसम मनोज मंगेश जागुष्टे याला तेथील इतर लोकांनी साखरपा रुग्णालयात नेले. हे मी सांगू शकत नाही की, सदरची गाडी वॅगनर कंपनीची होती व तीचा क्रमांक एमएच–०१–डीई–४७४९ असा होता अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची वॅगनअर गाडी कोल्हापुरकडुन रत्नागिरीकडे जात असताना कातळवाडी येथे वळणाच्या रस्त्यावर चुकीच्या बाजुला जावुन रत्नागिरीकडुन येणारा ट्रक क्रमांक एमएच–१२–एचडी–५३५९ ला ठोकर देवुन अपघात झाल्याचे मला नंतर समजले होते. हे मी सांगू शकत नाही की, अपघाताची खबर दत्तात्रय गुलाब दाते यांनी दिल्यामुळे सदर ठिकाणी पोलीस आले होते अगर कसे. हे मी सांगू शकत नाही की, मनोज जागुष्टे याने चुकीच्या बाजुला स्वतःची चारचाकी गाडी नेवुन अपघात केल्याने अपघात त्याच्या चुकीमुळे घडला होता अगर कसे. मनोज जागुष्टे याला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी मनोज जागुष्टे न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. एस. सी. आठल्ये यांच्याकडुन</u> –**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला व कसा झाला, हे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझे तपासटिपण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नावाचे तपासटिपण प्रकरणात दाखल असल्यास ते कसे आले, याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ''*सदरची वॅगनअर गाडी कोल्हापुरकडुन रत्नागिरीकडे जात असताना कातळवाडी येथे वळणाच्या रस्त्यावर चुकीच्या बाजुला जावुन रत्नागिरीकडुन येणारा ट्रक क्रमांक एमएच–१२–एचडी–५३५९ ला ठोकर देवुन अपघात झाल्याचे मला नंतर समजले होते*'' हा मजकुर मी सरतपासात खोटा कथन केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.10.09 17:53:26 +0530

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

दि. ०९.१०.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 09/10/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 09/10/2025 |
| Evidence uploaded on | :- | 09/10/2025 |